


दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ३११ ●बुधवार,दि.११ फेब्रुवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




## नेकनूर पोलिसांचा प्रताप, बेपत्ता मुलीच्या नातेवाईकाला पोलीस ठाण्यात मारहाण

### मुलीच्या नातेवाईकांनाच मारहाण, पत्रकारांनाही अरेरावी...

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीतील धावज्याचीवाडी येथील १७ वर्षीय तरुणी १ डिसेंबर २०२५ पासुन बेपत्ता आहे. यासंदर्भातली एक तक्रार नेकनूर पोलीस स्टेशन मध्ये दाखल आहे. त्याबाबतच्या तपासाची माहिती घेण्यासाठी आज सायंकाळच्या सुमारास पोलिस स्टेशनमध्ये गेलेल्या नातेवाईकांना पोलिसांनी मारहाण केली असा आरोप नातेवाईकांनी केला आहे. मुलीचा शोध का लागत नाही? असा जाब विचारल्याने पोलिसांनी मनात राग धरून मारहाण केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान नातेवाईक बिभीषण भोसले यांना पोलिसांनी पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवले होते. यादरम्यान पत्रकारांनी विचारपूस केली असता आणि व्हिडिओ काढत असताना अरेरावी करत दमदाटी केल्याचा प्रकार समोर आला आहे. पत्रकारांना अरेरावी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याचा एका तरुणाला धमकी देतानाचा व्हिडिओ काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता त्याच्या बातम्या देखील प्रसिद्ध झाल्या होत्या. दरम्यान पोलिसांनी याबाबत माहिती देताना सांगितले की पोलीस स्टेशन आवारात सदरील नातेवाईकांनी गोंधळ घातला यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येत आहे. मारहाण केल्याच्या आरोपांवर मात्र पोलिसांनी अद्याप कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

## बीड शहरातील मुलींच्या छेडछाड प्रकरणी कडक कारवाई करा

● भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेविका डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे एसपींना निवेदन
● शाळा-कॉलेज परिसरात दामिनी पथकाचे पेट्रोलिंग, बंद पोलीस चौक्या सुरू करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस परिसरात वाढत्या छेडछाड घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, नगरसेविका डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांची मंगळवारी (दि. १०) भेट घेऊन विविध मागण्या मांडल्या. शहरातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.



शहरातील शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसच्या बाहेर सध्या मुलींच्या छेडछाडीच्या घटना वाढत असल्याची बाब पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. काही ठिकाणी अशा प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन वातावरण बिघडविण्याचा प्रयत्न करत असल्याचेही सांगण्यात आले. या प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस परिसरात दामिनी (चिडीमार) पथकाच्या माध्यमातून सातत्याने पेट्रोलिंग करून संशयित हालचालींवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. याशिवाय शहरातील अनेक पोलीस चौक्या सध्या बंद अवस्थेत असल्याने त्या तातडीने सुरू करून तेथे आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही डॉ.क्षीरसागर यांनी केली. यासंदर्भात पोलीस अधीक्षकांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी युवा नेते राणा चव्हाण, भाजप विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष संग्राम बांगर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## सिने कलाकारांच्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन

### अभिनेत्री शिल्पा शेट्टी, संजय दत्त यांची उपस्थिती

**मुंबई । प्रतिनिधी**

भामला फाऊंडेशनच्या वतीने हिंदी फिल्म आणि टी व्ही क्षेत्रातील सिने कलाकारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठ्या उत्साहात करण्यात आले.

बांद्रा येथील विंग्ज स्पोर्ट्स च्या मैदानावर या स्पर्धा भामला फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आल्या आहेत. आज सायंकाळी स्पर्धेचे उद्घाटन तसेच विजेत्या संघाला मिळणा-या चषकाचे अनावरण ना. पंकजाताई



मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेते संजय दत्त तसेच हिंदी चित्रपट आणि टी व्ही सृष्टीतील अनेक नामवंत कलाकार यात सहभागी झाले होते. भामला फाऊंडेशनचे आसिफ भामला यांनी ना. पंकजाताई व पाहुण्यांचे स्वागत केले. ना. पंकजाताईंनी काही वेळ स्टेडियम मध्ये बसून पहिल्या मॅचचा आनंद घेतला.

## गेवराईच्या टेंडर दादाच्या दादागिरीला ब्रेक

### जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी संबंधित ठेकेदाराला दिला दणका

**बीड । प्रतिनिधी**




जिल्ह्यामध्ये सर्वसामान्यांना बांधकामासाठी वाळू मिळावी यासाठी गेवराई तालुक्यात दोन वाळूचे लिलाव घाट सुरू करण्यात आले होते परंतु यामध्ये संबंधित टेंडर धारकाने मनमानी करत टिप्पर चालकांना एकच ८० हजारांची पावती देत त्यात तीन ट्रिप करण्याची मुभा दिली होती. हा सर्व प्रकार जिल्हाधिकारी यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम टिप्पर मालकांना मोठा दंड ठोठावला होता. यानंतर टेंडर चालकाविरोधात कारवाई होईल की नाही असा प्रश्न उपस्थित झाला होता परंतु जिल्हाधिकारी यांनी संबंधित ठेकेदाराला जवळपास साडेसहा कोटीचा दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे गेवराईच्या टेंडरदादाच्या दादागिरीला एक प्रकारे ब्रेक उबसला आहे.गेल्या अनेक वर्षापासून गेवराईमध्ये संबंधित ठेकेदाराची मक्तेदारी सुरू होती. यातूनच कोटट्यवधीची माया या टेंडरदाराने कमावली परंतु आत्तापयरत एकाही जिल्हाधिकाऱ्याने याकडे विशेष लक्ष दिले नव्हते परंतु आता जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी या प्रकरणात चांगलेच लक्ष दिले असून गैरप्रकार करणाऱ्याविरोधात कारवाया करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे एकप्रकारे या सर्व बाबीला आळा बसताना दिसत आहे.

## पोलीस भरती पारदर्शक करण्यासाठी एसपींची यंत्रणा सक्षम

● १७४ जागांसाठी ८१७४ उमेदवारांचे अर्ज, अत्याधुनिक तंत्रज्ञान व सीसीटीव्हीचा राहणार वॉच
● संबंधित अधिकाऱ्यांना विशेष सूचना, फसवेगिरीला बळी पडू नका:पोलीस अधीक्षक काँवत

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये पोलीस भरती प्रक्रिया ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी या कालावधीत पार पडत आहे. शहरातील पोलीस मुख्यालय याठिकाणी ही भरती प्रक्रिया पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. बीड जिल्ह्यातील १७४ जागांसाठी जवळपास ८१७४ उमेदवारांनी



अर्ज दाखल केले आहेत. ही भरती प्रक्रिया पारदर्शक पार पडावी यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अत्याधुनिक तंत्राचा वापर करत संबंधित यंत्रणेला योग्य त्या सूचना दिल्या आहेत. तसेच काही या भरतीमध्ये फसवेगिरीचा प्रयत्न करत असून ही बाब पोलीस अधीक्षक काँवत यांच्या लक्षात येताच काँवत यांनी उमेदवारांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. कोणी पोलीस भरतीचे आमिष दाखवत असेल किंवा भरती करून देतो असे सांगत असेल तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका, अशा व्येंचीची आमच्याकडे तक्रार करा, फसवणूक करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे नोंद होतील. भरती प्रक्रियेमध्ये सर्व पारदर्शक भरती प्रक्रिया पार पडण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी यंत्रणा कामाला लावली आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मंत्रालयात पदभार स्वीकारला



**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनात उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभागांचा पदभार स्वीकारला. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख यांच्यासह आमदार, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## तुलसी आय.टी. कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

### विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सांस्कृतिक क्षेत्रातही पुढे यावे : सहाय्यक आयुक्त समाधान किरवले

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करावी. अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त समाधान किरवले यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे मंगळवार दि. १० रोजी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवगिरी




प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ. प्रेमचंद सिरसाट, प्रा. अर्जुन राठोड, आयु.दीपा रोडे, प्रा.डी.डी.राऊत, डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.प्रकाश ढोकणे, डॉ. सुनील जोंधळे आणि प्राचार्य डी. जी.निकाळजे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना समाधान किरवले म्हणाले की, स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देतात आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करतात. प्रमुख पाहुणे डॉ. प्रेमचंद सिरसाट यांनी विद्यार्थ्यांना संकटांवर मात करून ध्येय गाठण्यासाठी जिद्द व मेहनतीचा मंत्र दिला. प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी राष्ट्रप्रेमावर विशेष भर दिला. ते म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनुसार ▶▶ उर्वरित पान २ वर

## १ कोटी रुपयांचं बक्षीस... मुंबईकर शिक्षिकेचा दुबईच्या राजाकडून सत्कार



**मुंबई । प्रतिनिधी**

शिक्षक पुरस्कारांबद्दल आतापर्यंत तुम्ही अनेकदा ऐकलं असेल, वाचलं असेल. साधारणपणे सन्मानचिन्ह काही हजार रुपये आणि ▶▶ उर्वरित पान २ वर



# कंपन्यांची नोकरी आणि सुशिक्षित बेरोजगार

**● राज्यातच नव्हे तर आपल्या संपूर्ण भारत देशात एकीकडे बेरोजगारी भरमसाठ वाढली आहे तर दुसरीकडे कंपन्यांमध्ये मिळणाऱ्या नोकऱ्यांकडे बेरोजगार तरुण पाठ फिरवू लागले आहेत. या मागची कारणे काय चला जाणून घेऊ यात.**

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुका येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यात मिळालेल्या नोकऱ्यांच्या ऑफरकडे बेरोजगार तरुणांनी पाठ फिरविल्याचे दिसून आले आहे. या रोजगार मेळाव्यात बेरोजगार तरुणांना १२ ते १८ हजार रुपयांपर्यंत पगाराच्या नोकऱ्यांसाठी ऑफर लेटर देण्यात आले होते. मात्र अनेक तरुणांनी प्रत्यक्ष नोकरीत रुजू होण्यात रस दाखविला नसल्याचे दिसून आले आहे.

गेल्या वर्षी देखील अशाच प्रकारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आलेल्या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विविध ट्रेड उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांनाही आपापल्या कंपन्यांमध्ये नोकरीसाठी पाचारण केले होते. यानंतर काही विद्यार्थी संबंधित कंपन्यांमध्ये गेले देखील आणि त्यांनी काही दिवस कंपन्यांमध्ये कामही केले परंतु तिथे होत असलेले हाल बघून गेलेले विद्यार्थी बीडला परत आले. एकीकडे चांगल्या नोकऱ्या मिळत नसल्याने तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात नैराश्य आहे. तर दुसरीकडे रोजगार मेळाव्यात ५१ तरुणांना थेट ऑफर लेटर देण्यात आले असतानाही महिनाभरात फक्त चार बेरोजगार तरुणच नोकरीवर रुजू झाले. १२ जानेवारी रोजी अंबाजोगाई तालुक्यात जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात पुणे, औरंगाबाद, अहेमदनगर आणि बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवून भरती प्रक्रिया राबवली होती. या मेळाव्यात एकूण ५५७ रिक्त पदे होती. यासाठी बीड जिल्ह्यातील २३२ तरुण मेळाव्यात सहभागी झाले होते. यातून शिक्षण व पात्रतेनुसार काही कंपन्यांनी १५ ते २० हजार रुपयांपर्यंत पगाराच्या नोकऱ्यांसाठी ५१ तरुणांना ऑफर लेटर दिले. हा मेळावा होऊन एक महिना संपला तरी आतापर्यंत फक्त चार तरुणच नोकरीत रुजू झाले आहेत. यामुळे जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. परंतु नाराजी व्यक्त करताना तरुणांनी कंपन्यांच्या या नोकऱ्यांकडे का पाठ फिरवली? या मागची कारणे काय? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

रोजगार मेळाव्यातून बेरोजगार तरुणांना नोकऱ्या देण्याच्या निमित्ताने विविध कंपन्या पुढे येतात खरे मात्र त्यांच्याकडून देण्यात येत असलेल्या नोकऱ्या या कायमस्वरूपी नसतात. त्या तात्पुरत्या स्वरूपातील असतात. कंपन्यांच्या भाषेत बोलायचे झाल्यास कंपन्यांमध्ये पर्मनंट, टेम्पररी किंवा कॅज्युअल अशी नावे कामगारांच्या पदांना असतात. पर्मनंट कामगारांना चांगल्या पगारासह सर्व सोयी सुविधा असतात. टेम्पररी किंवा कॅज्युअल कामगारांना पगार नाममात्र आणि इतर कोणत्याही सोयी सुविधा नसतात. कामावर असताना कॅन्टीनच्या जेवणाचे कुपन सुद्धा दिले जात नाही. एवढंच काय अशा कामगारांना कामावर असताना काही दुखापत वगैरे झाली किंवा त्यांच्या जीवावर बेतले तर त्याची हमी किंवा जबाबदारी सुद्धा अशा कंपन्या घेत नाहीत. त्यांनी तशा प्रकारचे लिखित एग्रीमेंट तयार करून कामगारांना कामावर ठेवण्यापूर्वीच त्याच्यावर कामगारांची सही घेतलेली असते. शिवाय पर्मनंट कामगारांच्या तुलनेत टेम्पररी किंवा कॅज्युअल कामगारांना राबराब राबविले जाते. ज्या तरुणांना याबद्दल माहिती आहे असे तरुण मिळत असलेल्या या नोकऱ्या नाकारतात. कंपन्याकडून देण्यात येणारे पगार आणि कंपनी ठिकाणी जाऊन राहायला लागणारा खर्च, ज्यात घर भाडे, जेवणाची खानावळ याचा ताळमेळ म्हणावा तसा लागत नाही. कंपन्यांकडून १५ ते २० हजार पगार देण्यात येत असला तरी कंपन्यांच्या ठिकाणी भरमसाठ घर भाडे असतात. जेवणाच्या खानावळी इतर ठिकाणांपेक्षा जास्तीच्या दराने जेवण देतात. तिथे एक बेरोजगार तरुण अशा कंपन्यांमध्ये १५ ते २० हजार रुपये महिना कमवत असला तरी त्याच्या एकट्यासाठी नोकरीच्या ठिकाणी घर भाडे व दोन वेळेस चे जेवण आणि सकाळ चा नाश्ता यातच १२ ते १५ हजार रुपये खर्चाला लागतात. मग अशा कंपन्यांमध्ये नोकरी करणाऱ्या तरुणांच्या हातात दरमहा उरतंय काय? ते गावी आपल्या आई-वडिलांना देणार काय? असे प्रश्न त्यांच्या समोर आवासून उभे राहतात. सगळीकडे महागाई भरमसाठ वाढली आहे. वाढलेल्या महागाई प्रमाणे बेरोजगार तरुणांना पगार मिळाले पाहिजे. याकडे असे रोजगार मेळावे आयोजित करणाऱ्यांसह कंपन्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

**– एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार), आसेफ़नगर, बीड**

# स्वच्छ पर्यावरणासाठी सक्षम अभियानाचा संकल्प!

भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या 'सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)' हे राष्ट्रीय अभियान १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा) या घोषवाक्यासह संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे त्यानिमित्त

जागतिक पातळीवर वेगाने बदलणाऱ्या हवामानामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवासमोर आज मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक इंधनांचा वापर दिवसागणिक वाढत गेल्याने निसर्गावर मोठा ताण पडत असून, त्याचे दुष्परिणाम आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर ठळकपणे दिसू लागले आहेत. भविष्यात हे संकट आणखी भयावह होवू नये यासाठी समाजाने स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक ऊर्जे कडे प्राधान्याने वळणे, ही काळाची गरज बनली आहे.

कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारखी पारंपरिक इंधने मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यांच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायू वातावरणात मिसळतात. यामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानातील टोकाचे बदल, पावसाचे असमतोल स्वरूप तसेच




आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. श्वसनविकार, हृदयविकार आणि त्वचारोग यांसारखे आजार याच प्रदूषणाशी थेट जोडलेले आहेत. यावर उपाय म्हणून नवी ऊर्जा क्रांती आकार घेत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोगॅस, बायो-इंधन आणि हरित हायड्रोजन यांसारखे पर्याय आज प्रभावीपणे पुढे येत आहेत. या ऊर्जास्रोतांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे, ते अक्षय आहेत आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवता. पवन ऊर्जा निर्मितीमुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन देशाची आर्थिक बचतही होते. ऊसाच्या चिपाडापासून बनविल्या जाणाऱ्या इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाकडेही आपला देश गांभीर्याने पाहू लागला आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केल्यास, वाहतूक क्षेत्रातही मोठे बदल होतांना दिसत आहेत. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि पर्यायी इंधनावर चालणारी वाहने यांचा वापर वाढत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्राधान्याने स्वच्छ इंधनाचा समावेश केल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. यासोबतच इंधन बचतीच्या सवयी, कार पूलिंग, सायकलचा वापर आणि पायी चालण्यास प्रोत्साहन देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

घरगुती पातळीवरही स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवता येऊ शकतो. सौर पॅनल्सद्वारे वीज निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर आणि विजेचा अपव्यय टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. शाश्वत जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे संरक्षण नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने या ऊर्जा क्रांतिकडे पाहायला हवे.

या दिशेने केंद्र व राज्य सरकारांकडून विविध अभियानांद्वारे जनजागृती केली जात आहे. 'सक्षम'सारख्या मोहिमा नागरिकांना पर्यायी इंधनांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करत आहेत. उद्योग क्षेत्र, तसेच शहरे आणि ग्रामीण भागातही हरित ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. यामध्ये संशोधन, नवतंत्रज्ञान आणि स्थानिक सहभाग आदिला विशेष महत्त्व दिले जात आहे.

स्वच्छ पर्यावरण हा केवळ सरकारचा किंवा एखाद्या संस्थेचा विषय नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आज प्रत्येक स्तरावर घेतलेले छोटे निर्णय उद्याच्या मोठ्या संकटांना टाळू शकतात. पर्यायी ऊर्जेचा वापर, इंधन बचत, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास हरित, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपण भक्कम पायाभरणी करू शकतो. हीच खरी ऊर्जा क्रांती असून तिच्यात आपण सर्वांनी सहभागी होणे, ही काळाची गरज आहे.

# १४ फेब्रुवारी 'राष्ट्रीय मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा व्हावा !

संस्कृतीप्रिय देश म्हणून जगात ओळख असलेल्या भारतातील तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचाच अधिक प्रभाव असल्याने व्हॅलेंटाईन डे सारखे भोगवादाला खतपाणी घालणारे दिवस इथे उत्साहाने साजरे होतात. तरुणपिढीला हानिकारक असल्याचे लक्षात आल्यावर अनेक देशांनी व्हॅलेंटाईन डे साजरा करण्यावर बंदी घातली. आपल्या देशात मात्र तो वर्षागणिक अधिक फोफावतो आहे. भारतीय संस्कृतीला अनुसरून १४ फेब्रुवारी हा 'मातृ-पितृ पूजन दिन' म्हणून साजरा करावा, अशी मागणी गेल्या काही वर्षांत संस्कृतीप्रेमी संघटना आणि नागरिकांकडून केली जात आहे; मात्र शासनाकडून त्यास कोणताही प्रतिसाद मिळताना दिसत नाही. शासन याबाबत पुढाकार घेण्यास तयार नसले तरी अनेक धार्मिक आणि सामाजिक संघटनांनी मागील काही वर्षांपासून १४ फेब्रुवारी हा दिवस मातृ पितृ पूजन दिन म्हणून साजरा करण्यास आणि त्याबाबत समाजामध्ये जागृती करण्यास सुरुवात केली आहे. समाजातूनही या उपक्रमास भरघोस प्रतिसाद मिळत आहे. याबाबत शाळा आणि महाविद्यालयांमध्येही जागृती केली जात आहे. विद्यार्थ्यांकडूनही याविषयी सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थेसारखी कुटुंबव्यवस्था जगात कुठेही नाही. आयुष्यभर कुटुंबाला एका धाग्यात बांधून ठेवण्याचे काम माता-पिता करत असतात. आपल्या इच्छा-आकांक्षा, आपले सुख बाजूला ठेवून अपत्याला जगातील सर्व सुख सुविधा मिळाव्यात यासाठी ते दिवसरात्र झटत असतात. त्यांचे ऋण फेडणे जरी शक्य नसले, तरी वर्षातून किमान एक दिवस त्यांचे मनोभावे पूजन करून त्यांच्या उपकाराप्रती कृतज्ञता व्यक्त करणे सहज शक्य आहे. १४ फेब्रुवारी या दिवशी मातृ-पितृ पूजन दिन साजरा केल्यास आपसूकच व्हॅलेंटाईन डेचे महत्व कमी होऊन तरुणवर्गामध्ये आई-वडिलांविषयी आदर वृद्धिंगत होण्यास साहाय्य होईल.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई**

◆ पान ४ वरून पुढे...

## १३ फेब्रुवारीला....

समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी हा मेळावा महत्त्वाचा मानला जात आहे. या मेळाव्यास सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ साहेब आणि संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन उपस्थित राहून शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत. केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा एकत्र आणण्यासाठी माजी आमदार सौ संगीता ताई ठोंबरे व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आखलेली ही रणनिती आगामी राजकारणाच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे. केज विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय गणिते बदलणार असल्याचे संकेत माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांनी दिले आहेत. मेळाव्यास केज विधानसभा मतदारसंघातील सर्व शिवसेना पदाधिकारी, आजी माझी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पक्षाची ताकद दाखवावी, असे आवाहन केज तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, आंबेजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, महिला जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, बांधकाम कामगार जिल्हाप्रमुख रवी मुडेगावकर, आंबेजोगाई शहर प्रमुख गणेश जाधव, शहर प्रमुख बालासाहेब पवार, युवा सेना तालुकाप्रमुख दत्तप्रसाद काकडे, युवा सेना शहर प्रमुख आकाश चाळक, केज महिला तालुकाप्रमुख जयताई राऊत, आंबेजोगाई तालुकाप्रमुख सुनीताताई जाधव, केज शहर प्रमुख वैशालीताई सांगळे, आंबेजोगाई शहर प्रमुख तनुजाताई मुंडे उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, कैलास उगलमुगले, डॉक्टर संतोष बुडुक, विकास काशीद, सुनील पटाईत, दादासाहेब पटाईत, सरपंच अजित गोरे, युवा सेना विधानसभा प्रमुख अभिजीत घाटूळ, शिवाजी गायकवाड यांनी केले आहे.

## 'चला स्वच्छतेशी...

अधिकारी पूर्ण क्षमतेने सहभागी झाले असून, शहराच्या प्रत्येक भागात प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले आहे. 'मिशन ५२' अंतर्गत बीड शहरातील सर्व प्रभागांमध्ये स्वच्छतेबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबण्यात आले असून, रस्ते, पदपथ, चौक, सार्वजनिक जागा आणि नाल्यांवरील अनधिकृत अतिक्रमण हटविण्यासाठी कडक कारवाई केली जाणार आहे. नाल्यांवरील अनधिकृत जाळ्या, पायऱ्या, स्लॅब व बांधकामे कोणताही अपवाद न ठेवता काढण्यात येणार असून, पुन्हा अतिक्रमण करणाऱ्यांवर थेट दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे साहित्य, टपऱ्या व फलक हटवून शहराचे रस्ते मोकळे आणि सुरक्षित केले जाणार आहेत. या मोहिमेत शहरातील सर्व महापुरुषांचे पुतळे, स्मारके व चौकांची स्वच्छता व देखभाल करण्यात येणार असून, मुख्य बाजारपेठा, भाजी मंडई, मांस-मच्छी बाजार, बसस्थानक, शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, दवाखाने आणि सार्वजनिक शौचालय परिसरांची सखोल स्वच्छता केली जाणार आहे. नाल्यांची मशीनद्वारे सफाई, साचलेला गाळ काढणे, दुर्गंधी व डासोत्पत्ती रोखण्यासाठी फवारणी, तसेच प्लास्टिक कचऱ्यावर नियंत्रण यासाठी विशेष उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. रस्त्यावर, नाल्यात किंवा मोकळ्या जागेत कचरा टाकणाऱ्यांवर, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व अस्वच्छता करणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून,

◆ पान ४ वरून पुढे...

नियमबाह्य कचरा टाकणारी दुकाने, हॉटेल्स व आस्थापनांवर नोटीस व सील कारवाई केली जाणार आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी केवळ आवाहन नव्हे तर प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या विशेष मोहिमेत मा. जयतुला खान पठाण, मा. श्रीमती मीना गोडसे, मा. अफसर सर, मा. मोमिन खुर्शिद आलम, मा. नंदकुमार पिंगळे, मा. शेखा आतर, मा. श्रीमती भाग्यश्री देशपांडे तसेच बीड नगर परिषदेतील सर्व नगरसेवक सक्रिय सहभाग घेत असून, प्रशासन व लोकप्रतिनिधी संयुक्तपणे शहराच्या स्वच्छतेसाठी मैदानात उतरले आहेत. १० ट्रॅक्टर, २ जेसीबी, शंभरहून अधिक स्वच्छता कर्मचारी, आरोग्य व स्वच्छता विभागांचे संयुक्त पथक आणि सामाजिक संस्था, विद्यार्थी व स्वयंसेवकांच्या सहभागातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे केवळ शहर स्वच्छ करणे नव्हे, तर नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जबाबदारी, शिस्त आणि शहराविषयी आपुलकी निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी प्रेम फुलांपुरते न ठेवता, स्वच्छतेवर प्रेम करण्याचा आणि स्वच्छ बीड घडवण्याचा ठाम निर्धार करूया, अशी भावनिक आणि स्पष्ट साद बीड नगर परिषदेने शहरवासीयांना घातली आहे.

## शालेय साहित्य....

उपस्थिती होती. आदर्शाचे दीप प्रज्वलन करून तसेच पुष्प व पुष्पमाला अर्पण करून अभिवान करण्यात आले. पूज्य भिकू श्रामेनर बुद्धघोष यांनी उपस्थितना सामुदायिक त्रिसरण पंचशील दिले. महामानव अभिवादन ग्रुप चालवीत असलेल्या आम्रपाली बुद्ध विहार व जय भीम बुद्ध विहार येथील वर्गातील घटक चाचणीतील प्राविण्य मिळवलेल्या १६ विद्यार्थ्यांना व माता रमाईच्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत व वक्तृत्व स्पर्धेत प्रथम, द्वितीय आलेल्या ८ विदयार्थना वाचाल तर वाचाल तर्फे शालेय साहित्य ( वही पेन ) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व त्यागमूर्ती रमाई यांचे जीवन चरित्र पुस्तके देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याग मूर्ती रमाई जयंतीचे औचित्य साधून आम्रपाली बुद्धविहार व जयभिम बुद्ध विहार डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर (पूरग्रस्त कॉलनी) बीड येथे पाच ज्येष्ठ महिलांना रमाई पुरस्कार माया दिवाण लिखित रमाई पुस्तक देऊन तर एक ज्येष्ठ पुरुषाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे उत्तम प्रकारे आकलर व्हावे म्हणून महामानव आभिवादन ग्रुपने शालेय साहित्य वाटप कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना हासुरे इंग्रजी ग्रामर हे पुस्तक वितरित केले. कार्यक्रमाप्रसंगी अंजली वडमारे, हिनेदेखील रमाईच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. बीडच्या गान कोकिळा मंदा मस्के यांनी आपल्या सुमधुर आवाजात थांब रमा थांब एवढे वाचतो ग पान माता रमाईच्या जीवनावरील गीत गाऊन सर्व उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षीय समारोपात वैशाली शिंदे यांनी करून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल जेथे जेथे मुलांच्या स्त्रियांच्या प्रबोधन करण्याचा कार्यक्रम घेतील तिथे उपस्थित विद्यार्थी मुलांना संबोधी अकादमी तर्फे आल्पउपाहार देण्याचे जाहीर केले. महामानव आभिवादन ग्रुपला नेहमीच सहकार्य करायचे ठोस आश्वासन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रेखा गायकवाड, जवळे मॅडम, उमेश चांदणे दांपत्य, मोफत शिकवणी वर्गाचे शिक्षक रवींद्र टेकाळे व सौ टेकाळे, एस.एस.सोनवणे, आ.रडी.चक्रे बहुसंख्य विद्यार्थी पालक उपस्थित होते. सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

◆ पान ९ वरून पुढे...

## तुलसी आय.टी. ...

आपण सर्वांनी प्रथम 'भारतीय' म्हणून आपली ओळख जपली पाहिजे. महापुरुषांचे विचार अंगीकारल्यास देश महासत्ता होण्याचा मार्ग सुकर होईल. तसेच, पैशाच्या मागे धावताना माणुसकी विसरू नका आणि मोठ्या पदावर गेल्यानंतर समाजाचे ऋण फेडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी नमूद केले. उद्घाटनानंतर महाविद्यालयातील विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रे व स्मृतीचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये भरतनाट्यम आणि लावणीचे बहारदार सादरीकरण, कोळीगीत आणि देशभक्तीपर गीतांवर आधारित नृत्ये, गायन व वाद्यसंगीताचे वैविध्यपूर्ण कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य ठोंबरे व रोहित गव्हाणे यांनी केले, तर आभार डॉ. योगिता लांडगे यांनी मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## १ कोटी रुपयांचं बक्षीस....

प्रमाणपत्र असं कोणत्याही शिक्षक पुरस्काराचं स्वरुप असतं. पुरस्कार देणारी संस्था फारच मोठी असेल तर लाखांपर्यंत वगैरे बक्षिसाची रक्कम दिली जाते.

◆ पान ९ वरून पुढे...

मात्र नुकत्याच देण्यात आलेल्या एका पुरस्काराची रक्कम तब्बल ९ कोटी रुपये इतकी असून हा पुरस्कार मुंबईतील एका शिक्षिकेला मिळाल आहे. ही शिक्षिका कोण आणि हा पुरस्कार काय आहे ते जाणून घेऊयात... झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन मुलांना शिकवण्याचा ध्यास घेतलेल्या मुंबईकर महिला शिक्षिकेला हा पुरस्कार दुबईमधील क्राऊन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी स्वत: प्रदान केलाय. या महिला शिक्षिकेचं नाव रूबल नागी असं आहे. तर त्यांना मिळालेल्या पुरस्काराचं नाव जेम्स एज्युकेशन ग्लोबल टीचर पुरस्कार असं आहे. हा पुरस्कार जिंकणाऱ्या शिक्षकाला १० लाख अमेरिकन डॉलर्सचं बक्षीस दिलं जातं. याहून थक्क करणारी गोष्ट म्हणजे मुंबईकर रुबल नागी यांची निवड जगभरातील १३९ देशांतील ५००० शिक्षकांमधून करण्यात आली आहे. म्हणून हा सन्मान प्रत्येक भारतीयासाठी फारच गौरवास्पद बाब आहे. वर्ल्ड गव्हर्मेंट समिटच्या शेवटच्या दिवशी रूबल नागी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. रूबल या 'मिसाल इंडिया' मोहिमेच्या माध्यमातून लाखो मुलांपर्यंत शिक्षणाच्या संधी घेऊन पोहचल्या. हा पुरस्कार मी गेल्या २४ वर्षात केलेल्या कठोर परिश्रमाचे फळ आहे. हे खरं तर एक स्वप्न पूर्ण होण्यासारखे आहे, असं पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावूक झालेल्या रूबल नागी यांनी म्हटलं. रोज सकाळी उठून भारतातील दूर्गम भागातील झोपडपट्ट्यांमध्ये जावून मुलांना शिकवणे आणि त्यांच्याकडून शिकणे हे माझे एकमेव लक्ष्य होते.

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब,**
**(क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**भागवत व ईतर विरुध्द निल.**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ४१/२०२५**

अर्जदार :- **१) भागवत पि. मारुती ऊर्फ मारोती बहिर वय ७७ वर्षे, धंदा शेती, रा. शिरापुर धुमाळ, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) सुरेश पि. मारुती बहिर वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ३) रमेश पि. मारुती ऊर्फ मारोती बहिर वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. मो. नं. ९८५०१३८३३१. ४) विजुबाई पि. मारुती बहिर वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर. ५) राजुबाई भ्र. हनुमान घोलप वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. तळेगाव, ता. जि. बीड,**

विरुध्द निल.

अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा **मयत नामे मारुती पि. आबा बहिर रा. शिरापुर धुमाळ, ता. शिरुर का., जि. बीड, रहिवाशी असुन ते दि. ०१/०१/१९७९ रोजी मौजे शिरापुर धुमाळ, ता. शिरुर का., जि. बीड,** येथे अर्जदारांचे राहते.. घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मुले असुन अर्जदार क्र. ४ व ५ या मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सद्रहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १०/२/२०२६ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख ३१/०३/२०२६**
**(ॲड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत)**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर शिरूर का.**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

शिक्का

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब,**
**(क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं.४२/ २०२६**
**राहुल व ईतर विरुध्द निल.**

. अर्जदार :- **१ ) राहुल पि. सखाराम खोले वय ३५ वर्षे, धंदा शेती व नौकरी, रा. राक्षसभुवन (तांबा), ता. शिरुर कासार, जि. बीड, मो. नं... २) कार्तीकी पि. राहुल खोले वय ०४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. वडील अर्जदार क्र. १ नामे राहुल. ३) श्रावणी पि. राहुल खोले वय ०२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अज्ञान अ. पा. क. वडील अर्जदार क्र. १ नामे राहुल.**

विरुध्द निल.

अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्यापेक्षा **मयत नामे उर्मिला ऊर्फ उमा भ्र. राहुल खोले रा. राक्षसभुवन, ता. शिरुर का., जि. बीड, 'येथील रहिवाशी असुन ते दि. ३१/१२/२०२३ रोजी मौजे राक्षसभुवन, ता. शिरुर का., जि. बीड,** येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हे मयताचे पती असुन अर्जदार क्र. २ व ३ ह्या अज्ञान मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे 'उपरोक्त मयताचे वारस नव्हेंत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१०/२/२०२६ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख - ३१/३/२०२६
**(ॲड. एच. एस. कोठुळे यांच्यामार्फत)**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर शिरूर का.**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

शिक्का

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मृद व जलसंधारण योजनांची सर्व कामे वेळेत पूर्ण करा : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन्ही योजना कायमस्वरुपी राबविण्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या या दोन्ही योजना ग्रामीण भागातील जलसंधारणासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या योजनांचे मुख्य उद्दिष्ट भूजल पातळी वाढवणे आणि शेतीसाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे हे आहे. तरी मृद व जलसंधारण योजनांची सर्व कामे विहीत वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात शुक्रवार दि.९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी एस.एस.वाघमारे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी व्ही. ढोबळे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, सामुहिक शेततळे, बांधबंदिस्ती, फळबाग लागवड योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि नाला खोलीकरण व रुंदीकरणाची कामे, प्रलंबित कामे तत्परतेने पुर्ण करावी. खोलीकरणामुळे पाणी जमिनीत जिरण्याचे प्रमाण वाढेल, ज्याचा फायदा परिसरातील विहिरींना होईल. जिल्ह्यातील टँकरमुक्त गावे करण्यासाठी पाण्याचा साठा अत्यंत महत्वाचा आहे. ग्रामस्तरीय ग्रामरोजगार सेवकांना योग्य प्रशिक्षण देवून प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

गाळ काढण्यासाठी व नाला खोलीकरण व रुंदीकरण करण्यासाठी यंत्रसामुग्री व इंधन खर्च यासाठी ३१ रुपये प्रती घ.मी. दर अदा करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना गाळ वाहुन नेण्यासाठी अनुदान ३५.७५ रुपये प्रती घ.मी. हे फक्त गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेसाठी लागू राहील. जिल्हास्तरीय समितीकडून कार्यपध्दतीप्रमाणे काम करणे व अवनी ग्रामीण पनूसार वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ४० कामे पुर्ण झाली असून ४००९३६ घ.मी. गाळ काढण्यात आलेला आहे. सन २०२५-२६ अंतर्गत पुर्ण झालेल्या ४० कामांची २७२.५३ लक्ष रुपये इतकी निधी मागणी व सन २०२४-२५ अंतर्गत ९ कामांची ४७.५२ लक्ष रुपये असे एकुण ४९ कामांची ३२०.०५ लक्ष इतकी निधी मागणी शासनास सादर करण्यात आली आहेत. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा आराखडा सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये चालू व मागील वर्षातील जलाशयातील कामे कामांची संख्या ८०, गाळ परिमाण ८६३.९७ स.घ.मी. तर रक्कम ६०९.९४ लक्ष रुपये एवढी आहे. आगामी वर्षातील गाळमुक्त धरणाची जलाशयातील कामे कामांची संख्या ७२४, गाळ परिमाण ८३५८ स.घ.मी. तर रक्कम ६१३१.९६ लक्ष रुपये एवढी आहे. तसेच चालु व मागील वर्षातील नाला खोलीकरणाची कामे घेण्यात आलेली नाही. आगामी वर्षात नाला खोलीकरण व रुंदीकरणाची कामे राबविण्यात येणार आहेत,

## कर्जतच्या आदर्श पत्रकार संघ पुरस्कार कार्यक्रमाला उपस्थित रहा

बीड । प्रतिनिधी



मराठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या पत्र महर्षी रंगा आण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजीनगर विभागाचे विभागीय सचिव रवी उबाळे विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण कर्जत येथे दिनांक २२ फेब्रुवारी रोजी रविवारी रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे रॉयल गार्डन मध्ये सकाळी ११ वाजता आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख सर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला संभाजीनगर विभागातील सर्व तालुका आणि जिल्हा पत्रकार संघाने उपस्थित राहावे असे आवाहन संभाजीनगरचे विभागीय सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे यांनी केले आहे.

## भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखा; अन्यथा २० फेब्रुवारीपासून नगरपालिकेच्या दारात आंदोलन : शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात वाढलेल्या भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख कामरान खान (एकनाथ शिंदे गट) यांनी केली आहे. अन्यथा दि. २० फेब्रुवारी २०२६ पासून बीड नगरपालिकेच्या दारात आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांनी लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांवर हल्ले



केल्याच्या घटना वाढल्या असून, अनेक ठिकाणी नागरिकांना चावा घेऊन गंभीर जखमा झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस नागरिकांमध्ये भीती वाढत आहे.

राज्यात भटक्या कुत्र्यांकडून चावा घेण्याच्या घटनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, अशा कुत्र्यांची नसबंदी करणे व रेबीज विरोधी लस देणे याबाबत केंद्र सरकारच्या स्पष्ट मार्गदर्शक सूचना आहेत. या सूचनांच्या चौकटीत राहून कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात विशेष मोहीम राबविण्याचा सकारात्मक निर्णय घेतला जाईल तसेच यासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी दि. १२ जुलै २०२५ रोजी जाहीर केले होते.केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भटक्या श्वानांची नसबंदी केल्यानंतर त्यांना ज्या ठिकाणाहून पकडण्यात आले, त्याच ठिकाणी पुन्हा सोडणे बंधनकारक आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या स्तरावर निविदा काढून उपाययोजना करतात. मात्र बीड शहरासह परिसरात ही समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने, बीड नगरपालिकेने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे खान यांनी स्पष्ट केले.

नगरपालिकेने त्वरित ठोस पावले उचलली नाहीत, तर आंदोलन अटळ राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव जरूड रोड ता. जि.बीड येथे कृष्ठरोगांच्या संपूर्ण आयुष्य समाजसेवन स्वर्गीय बाबा आमटे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने एक झाड एक जीवन अभियान राबवले. यावेळी या अभियानाचे प्रमुख तेजस्विनी पवार यांनी बाबा आमटे यांच्या जीवनाबद्दल मार्गदर्शन केले व वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी उपाध्यक्ष संस्थेचे तेजस्विनी पवार,अमोल अडाणे तसेच गावकरी होते.*

## हास्यविनोदाचा जन्म हा वेदनेतून होतो हास्यकवी: विष्णू सुरासे

### सौ.के.एस.के.महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन विविध उपक्रमाने संपन्न

बीड । प्रतिनिधी



लेखक कवी लेखन अथवा व्यक्त होताना त्याने सामाजिकतेचे भान ठेवले पाहिजे. विनोद हा आपल्या शैलीतून व्यक्त होताना उपस्थितांना हसविले पाहिजे. त्यासाठी विनोदाचा जन्म हा वेदनेतून होत असतो असे विचार हास्यकवी विष्णू सुरासे यांनी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ,बीडच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाटन प्रसंगी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर या होत्या.यावेळी त्या म्हणाल्या की, स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या आनंदाचा दिवस असून यादिवशी विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांचाही गौरव करणारा हा कार्यक्रम असून यामधून विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक, बौध्दिक समृध्दता वाढवी म्हणून त्यांच्या कला, गुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनातून विविध उपक्रम राबविले जातात.यासाठी विद्यार्थ्यांमध्ये विन्रमता आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे कर्म,आचरण, वागण, बोलन चांगल असाव. त्यासाठी जात,धर्म, पंथ,लिंग भेद मानू नये असे मत व्यक्त केले. अनेक कवींच्या कवितांच्या आधारे विद्यार्थ्यांचे प्रबोधन त्यांनी या प्रसंगी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विविध विभाग व प्राध्यापकांना विविध क्षेत्रात यश व कार्य केल्याबद्दल महाविद्यालयाच्यास वतीने सन्मानीत करण्यात आले.

## राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत आदित्य विद्यागर यांना सुवर्णपदक; राजर्षी शाहू कन्या विद्यालयात भव्य सत्कार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा नागपूर येथे दिनांक ३० जानेवारी २०२५ ते २ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न झाली. या स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयातील विद्यार्थी आदित्य अरविंद विद्यागर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय यशाबद्दल राजर्षी शाहू कन्या विद्यालय, बीड येथे आदित्यचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. हा सत्कार श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे सचिव मा. प्रा. जे. पी. शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, प्राथमिक



विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे तसेच सर्व शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सत्कारप्रसंगी मा. प्रा. जे. पी. शेळके यांनी आदित्यचे अभिनंदन करत सांगितले की, आदित्यने मिळवलेले सुवर्णपदक हे त्याच्या मेहनतीचे फलित असून संपूर्ण शाळा व बीड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. भविष्यातही त्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करावे. यावेळी त्यांनी क्रीडा क्षेत्राविषयी बोलताना सांगितले की, मा. अजितदादांनी खो-खो संघटनेला मोठ्या प्रमाणात सहकार्य केले असून त्यांच्या सहकार्यामुळे खो-खो संघटनेच्या माध्यमातून खो-खो हा खेळ अधिक उंच पातळीवर पोहोचला आहे. यासोबतच त्यांनी खो-खो खेळाशी निगडित काही आठवणी उपस्थितांसमोर मांडल्या. उपस्थित सर्व मान्यवरांनी आदित्यला पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, सुवर्णपदक विजेता आदित्य अरविंद विद्यागर हे बीड जिल्ह्याचे जिल्हा क्रीडाधिकारी अरविंद विद्यागर यांचे सुपुत्र असून क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरा पुढे नेत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी सीनियर नॅशनल खो-खो स्पर्धेत महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावल्याबद्दल तुकाराम कारंडे यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांसाठी संपन्न झाले आरोग्य शिबीर



बीड । प्रतिनिधी

बीड बालरंगभूमी परिषद आणि सोनाजीराव क्षीरसागर होमीओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीर नुकतेच बीड येथे पार पडले. हे शिबीर बालरंगभूमी परिषदेच्या संभासदांसाठी होते. यातमध्ये जवळपास ७५ सभासदांची तपासणी करण्यात आली असल्याची माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील बालरंगभूमी परिषदेच्या सर्व शाखामध्ये असे शिबीर गेल्या वर्षापासून बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष मा. निलम शिर्के सामंत यांच्या पुढाकाराने आयोजित केले जात आहे. बीड येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या हॉलमध्ये हे शिबीर दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आले. सोनाजीराव क्षीरसागर होमीओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल यांच्या मार्गदर्शनाखाली पंधरा डॉक्टरांच्या टीम ने बी.पी., शुगर, हिमोग्लोबीन, रक्तगट तपासणी केली.

## बीड जिल्ह्यातील सर्व केवायसी व आधार सादरीकरणाचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकर्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकर्यांची थकीत, कर्जाच्या विळख्यातुन सोडवणूक करण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालिन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती पोर्टलवर भरण्या बाबत शासनाचे युध्द पातळीवर कामकाज सुरु असुन ही माहिती शासनाने पोर्टलवर भरण्यासाठी सर्व थकबाकीदार शेतकर्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्यामुळे त्यांचे आधार नंबर आवश्यक आहेत. तरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या व बँकेकडे बहुतांश शेतकर्यांचे आधार कार्ड उपलब्ध नाहीत त्यामुळे सर्व शेतकर्यांना विनंती करण्यांत येते की, 'बीड जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतकर्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्याने तसेच जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा सहकारी संस्था व बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड

## माता रमाई जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेत राजलक्ष्मी जाधव प्रथम; माऊंट लिटरा झी स्कूलमध्ये गुणवंत विद्यार्थिनीचा सन्मान

परळी वै. । प्रतिनिधी

माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरी शालेय व महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथील विद्यार्थिनी राजलक्ष्मी विकास जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल राजलक्ष्मी जाधव हिचा माऊंट लिटरा झी स्कूल, परळी येथे विशेष सत्कार समारंभ आयोजित करून गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक कैलास घुगे, शाळेचे प्राचार्य मंगेश काशीद, तसेच सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी राजलक्ष्मी जाधव हिला स्पर्धे



त प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल ५,००० रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी तिच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राजलक्ष्मी जाधव हिने आपल्या निबंधातून मासाहेब जिजाऊ यांच्या शौर्यगाथा व कथा त्याग, संघर्ष व सामाजिक योगदानाचे प्रभावी मांडणी केली असून, तिच्या विचारशील लेखनशैलीचे परीक्षकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

## धम्मभूमी शिवणी येथे माता रमाई जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

त्यागमूर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर मौजे शिवणी येथे प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थे तर्फे उत्साहात संपन्न करण्यात आली. बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन येथून ठिक सकाळी ९ वाजता माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची शुशोभित रथामधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत पु.भिक्खु पय्यांवर्धन भन्ते आणि पु.भन्ते बुध्दबोध्दी व बीड शहरातील बहुसंख्य महिला व पुरुषांची उपस्थिती होती. प्रत्येकाकडे पंचशील ध्वज होता. त्यागमूर्ती माता रमाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व धम्म ध्वजाच्या विजयाच्या घोषणेने वातावरण धम्ममय झाले होते.



राष्ट्रमाता जिजाऊ, महात्मा ज्योतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाईच्या वेषभूषेतील बालकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास आणि त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पु.भन्तेजींच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले.

दुपारी ठिक १२ वाजता धम्मभूमी शिवणी येथे पु.भिक्खु पय्यांवर्धन (हिंगोली) यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी बीडच्या समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम आणि एकपात्री नाटककार कु.खुशबू मिसळे (नेर, जि.यवतमाळ) यांचे हस्ते त्यागमूर्ती माता रमाईंना व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. पु.भिक्खु संघांनी उपस्थितांना त्रिशरण आणि पंचशील देण्यात आले. कार्यक्रमाकरीता पु.भिक्खुनी चारुशीला (नांदेड) व प्रमुख पाहुणे म्हणून बीडच्या समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मिश्राम यांची उपस्थिती होती.

आपल्या धम्मदेसनेत पु.भिक्खुनी चारुशीला म्हणाल्या की, त्यागमूर्ती माता रमाईंचा त्याग म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उच्च शिक्षणाकरीता त्यांना संसाराच्या जाळ्यात अडकवून न टाकता अपार कष्ट करुन आपला संसार चालविला. कोणत्याही दाग-दागिन्याची किंवा हौस, मौज मजेची अपेक्षा न करता अत्यंत अपार कष्ट करुन आपला संसार चालवला. औषध-पाण्या अभावी आपली चार लेकर गमावली तरीही बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेवून आल्यावर समाजाच्या, देशाच्या व समस्त स्त्रीयांच्या उध्दाराकरीता करीत असलेल्या कार्याला अडथळा आणला नाही. हा त्यांचा त्याग कोणीही विसरु शकत नाही.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ ●

थोडक्यात...

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये बारावी बोर्डाची परीक्षा सुरळीत सुरू



**धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणारी बारावीची परीक्षा राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर येथील परीक्षा केंद्रावर अत्यंत सुरळीत आणि शांततामय वातावरणात पार पडत आहे. शिस्तबद्ध नियोजन, परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येत असून केंद्रावर कडक शिस्त पाळली जात आहे. परीक्षेसाठी बैठे पथक म्हणून श्री. आडसकर बी. बी, श्री. मुंडे एल. एम., श्री. राठोड पी. आर. हे कार्य करत आहेत. या परीक्षा केंद्राचे कामकाज केंद्रप्रमुख बाळासाहेब चवार आणि सहकेंद्रप्रमुख देशमुख पी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शकपणे परीक्षा सुरू आहे. सदर केंद्रावर एकूण ४२४ विद्यार्थ्यांची नोंदणी असून, त्यापैकी ४१० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची तपासणी करूनच त्यांना प्रवेश दिला जात आहे. केंद्रप्रमुख बाळासाहेब चवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाखाली न येता परीक्षा द्यावी यासाठी केंद्रावर पोषक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. तसेच सर्व पर्यवेक्षक आणि कर्मचारी परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड यांनी सर्व परीक्षार्थींना परीक्षा देण्यासाठी सदिच्छा दिल्या.

# हरवलेल्या अल्पवयीन मुलीचा काही तासांत लावला शोध

## पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ व बीड शहर पोलिसांची तत्परता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीने क्लासेसमधून निघून गेल्याची तक्रार समोर येताच पोलिसांनी तात्काळ याची गंभीर दखल घेत शोधमोहीम हाती घेतली. जलद हालचाली, तांत्रिक तपास आणि स्थानिक पातळीवरील समन्वय यांच्या जोरावर पोलिसांनी अल्पावधीतच मुलीचा सुरक्षित शोध लावला. त्यानंतर संबंधित मुलीला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला असून, शहर पोलिसांच्या तत्परतेबद्दल पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी वेळ न दवडता विविध ठिकाणी चौकशी, माहिती संकलन आणि आवश्यक पडताळणी करत मुलीपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. दरम्यान, तपासात असेही आढळून आले की काही अल्पवयीन मुली सोशल मीडियाच्या माध्यमातून अनोळखी व्यक्तींच्या संपर्कात येत आहेत. अशा संपर्कातून फूस लावणे



किंवा पळवून नेण्यासारख्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पालकांनी अधिक जागरूक राहणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. वेळीच माहिती मिळाल्यास अनुचित घटना टाळता येतात आणि प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य होते. गैरवर्तन करणाऱ्या व समाजविघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींवर पोलिसांची कारवाई सुरूच असून, या मोहिमेत पालक, शिक्षक आणि नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. या घटनेतून सतर्कता आणि समन्वय किती महत्त्वाचा आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, डी वाय एस पी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ,पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, मंगेश शिंदे, राम पवार, इलियास शेख, बापू गायकवाड या शोध मोहिमेत सहभागी होते.

### ● पोलिसांचे आवाहन

**पालकांनी आपल्या मुला–मुलींच्या मोबाईल वापरावर व त्यांच्या संपर्कांवर लक्ष ठेवावे. मुलांशी सतत संवाद साधून त्यांना विश्वासात घ्यावे. कोणतेही संशयास्पद चॅटिंग, फोन कॉल किंवा वर्तन आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. तसेच शाळा, महाविद्यालये व क्लासेसचे संचालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या हालचालींबाबत सतर्क राहून आवश्यक ती माहिती वेळेवर द्यावी.**

# १३ फेब्रुवारीला केज विधानसभा शिवसेनेचा कार्यकर्ता मेळावा

## मंत्री संजय शिरसाठ, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती



**बीड । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदारसंघात आगामी राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू केली असून, माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्या प्रवेशानंतर मोठे शक्ती प्रदर्शन करण्यासाठी शिवसेनेचा केज विधानसभा मेळावा शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता केज येथील मुक्ताई मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. शिवसेनेच्या उपनेत्या व माजी आमदार संगीता ताई ठोंबरे , जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, अनिल दादा जगताप, स्वप्नील भैया गलधर यांच्या नेतृत्वाखाली मेळावा यशस्वी करण्यासाठी नियोजन सुरू आहे. संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आगामी जिल्हा परिषद पंचायत ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'चला स्वच्छतेशी प्रेम करु' ; स्वच्छ, सुंदर व शिस्तबद्ध बीडसाठी 'संत गाडगेबाबा स्वच्छता मोहीम : मिशन ५२' ला सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी प्रेम केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न ठेवता, आपल्या शहरावर, सार्वजनिक आरोग्यावर आणि भावी पिढीच्या सुरक्षित भविष्यासाठी व्यक्त करण्याचा संकल्प बीड शहराने केला आहे. चला स्वच्छतेशी प्रेम करू या संकल्पनेतून संत गाडगेबाबा विशेष स्वच्छता मोहीम – 'मिशन ५२' चा भव्य शुभारंभ दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड शहरात मा. आमदार अमरसिंह पंडित यांच्या हस्ते होत असून, या मोहिमेच्या माध्यमातून शहर स्वच्छ, सुंदर व शिस्तबद्ध करण्यासाठी प्रशासनाने कडक आणि निर्णायक पावले उचलली आहेत, अशी माहिती बीड नगर परिषदेचे स्वच्छता व आरोग्य सभापती मा. शेख निजाम



साहेब यांनी दिली.

स्वच्छता, शिस्त आणि नागरिकांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या दिवंगत स्व. अजितदादा पवार यांचे स्वच्छ शहराचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यांच्या प्रत्येक भाषणातून आणि कार्यातून स्वच्छतेबाबतची स्पष्ट दिशा महाराष्ट्राने अनुभवली असून, बीड शहरही त्यांच्या विचारांप्रमाणे स्वच्छ, आरोग्यदायी आणि शिस्तबद्ध व्हावे, हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे.

स्व. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या मा. उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे. त्यांच्या बीड शहरात आगमनापूर्वी शहर स्वच्छ, सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध दिसावे, तसेच अजितदादांनी बीडकरांना दिलेला स्वच्छतेचा शब्द पूर्ण व्हावा, या भावनेतून 'मिशन ५२' प्रत्यक्ष अंमलात आणले जात आहे.

ही विशेष स्वच्छता मोहीम मा. आमदार अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, प्रतिनिधी शेख मुजीबभाई, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारूक पटेल तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या मोहिमेत नगरपरिषद प्रशासन, स्वच्छता व आरोग्य विभाग, बांधकाम विभाग आणि संबंधित ▶▶ उर्वरित पान २ वर

# शालेय साहित्य वाटप करून माता रमाई जयंती साजरी

## महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल तर्फे विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

त्यागमूर्ती हा शब्द उच्चारल्या बरोबर ज्यांची करुणामय प्रतिमा डोळ्यासमोर येते ती माता म्हणजे त्याग मूर्ती माता रमाई, ज्यांच्या असीम त्यागामुळे दीन दलित वंचित बहुजन व समस्त स्त्रियांचा उद्धार करीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरता खडतर प्रयत्न करून वेळप्रसंगी शेणाच्या गौऱ्या थापून



आपला संसार चालविला व ज्या मातेला योग्य औषधोपचार विना चार अपत्य गमवावे लागले तरी आपल्या साहेब नावाच्या प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब यांच्या शिक्षणाला मदत करणाऱ्या त्याग मूर्तीच्या त्यागामुळेच आज हे सोन्याचे दिवस दिसत आहेत. तेव्हा त्यांचे उपकार व स्मरण कोणीही विसरू शकत नाही तेव्हा त्यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करून आपले जीवन क्रमण करणे हेच जयंतीदिनी खरे अभिवादन माता रमाईला ठरेल असे रमाई पुस्तकाच्या सुप्रसिद्ध कवयित्री लेखिका माया दिवान /सोनवणे यांनी जय भीम बुद्ध विहार पूरग्रस्त कॉलनी बीड येथे स्पष्टपणे प्रतिपादन केले. महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल च्या संयुक्तविद्यमाने आयोजित माता रमाई जयंती कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक वैशाली शिंदे तर प्रमुख वक्ते माया दिवाण /सोनवणे, भारतीय बौद्ध महासभा महिला तालुकाध्यक्ष मंदा मस्के, अंजली वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. महामानव आभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी. जी.वानखेडे, समता सैनिकदलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले, प्रा. डॉ.शिवाजी दिवाण प्रियदर्शी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. अशोक गायकवाड व अँड. तेजेस वडवारे यांची विचार मंचावर प्रमुख ▶▶ उर्वरित पान २ वर



*साप्ताहिक श्रेयसराज चे संपादक तथा पत्रकार शिवनाथ काळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री कल्याणराव काका आखाडे साहेब यांनी वेळात वेळ काढून प्रत्यक्ष येऊन शुभेच्छा दिल्या यावेळी सोबत सावता परिषद तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, जिल्हा उपाध्यक्ष गणेश काशीद, गेवराई शहराध्यक्ष भागवतराव घोडके, रामेश्वर वादे , अमोल वादे, बंटी जंवजाळ, महादेव वादे व मित्र परिवार उपस्थित होते.*

## आदित्य कृषी महाविद्यालयात आज बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी या विषयी मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या विविध संधींबाबत योग्य दिशा मिळावी या उद्देशाने महाविद्यालयात आज बुधवार ११ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. शिबिरात एचडीएफसी बँकेचे सिनियर मॅनेजर शाम पवार हे बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षा, निवड प्रक्रिया, आवश्यक कौशल्ये, तसेच खासगी व राष्ट्रीयीकृत बँकांमधील भरती प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. बँकिंग क्षेत्रातील वाढता विस्तार, डिजिटल बँकिंग, कृषी कर्ज योजना आणि ग्रामीण बँकिंगमधील करिअरच्या संधी याबाबतही ते विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. तर आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे हे कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे वाढते महत्त्व, एम.एस्सी. (कृषी) व इतर उच्च शिक्षण अभ्यासक्रम, संशोधनाच्या संधी, शिष्यवृत्ती योजना तसेच कृषी क्षेत्रातील उद्योजकता यावर मार्गदर्शन करणार आहेत. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वाढता वापर, जैवतंत्रज्ञान, अन्न प्रक्रिया उद्योग, कृषी व्यवसाय व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांतील संधींबाबतही ते विद्यार्थ्यांना माहिती देणार आहेत. या शिबिरातून विद्यार्थ्यांना बँकिंग व कृषी या दोन्ही क्षेत्रातील करिअर पर्याय स्पष्ट होतील व भविष्यातील वाटचालीसाठी योग्य दिशा मिळणार आहे.

# राज्यसरकारी कर्मचाऱ्यांना 3 टक्के वाढीव महागाई भत्ता लागू त्वरित लागू करावा - मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै २०२५ पासून लागू झालेला ३ टक्के वाढीव महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक–प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्वरित लागू करावा असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व संबंधीतांकडे केली आसल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिली आहे.

याबाबत अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, बाजारात होत असलेली प्रचंड महागाई वाढ लक्षात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्यांच्या महागाई भत्ता ५५ टक्क्यावरुन ५८ टक्क्यांवर गेला आहे. तर राज्यातील



कर्मचारी व शिक्षकांना अद्याप ५५ टक्केच महागाई भत्ता मिळत आहे.केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करून आज जवळपास सात महिने झाले आहेत. तरी राज्यशासनाकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात वाढ करण्याची हालचाल दिसून येत नाही. केंद्रा प्रमाणे वेतन व भत्ते देण्याचे राज्यसरकारचे सुत्र आसून केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते लागू केले की राज्य सुध्दा त्यांच्या कर्मचाऱ्यांना दोन महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी करत असते. परंतू सदरील ३ टक्के वाढीव महागाई भत्ता सात महिने होऊन गेले तरी तो अद्याप पर्यंत लागू केला गेला नाही. म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. तरी राज्यसरकारने या मागणीची तात्काळ दखल घेऊन राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक–प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने १ जुलै २०२५ पासून लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधीतांकडे प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. मागणी पत्रकावर मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे, व्ही. जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, गुट्टे एस.जी.कोषाध्यक्ष औताडे ए.बी.,सहसचिव पवार टी. जी.,माळी एन.जी.,श्रीमती रेखा साळुंखे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव, अशोक मस्कले, मधुकर जोंधळे, रातोळे जी.जी., कुरेशी ए.ए., राठोड पी.आर., सुर्यवंशी आर.एन.,कदम व्ही. जी.,कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी., सोळंके एन.टी.,वऱ्हाड बी.ए.,तिर्थकर एस.एस., जमादार एफ.बी., पाटील पी.एस.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, व्यंकटराव चिलवरवार, बसवेश्वर माने,शेरखाने जे.एस.,रमेश आंधळे, यशवंत मकरंद, हरिभाऊ भडके, हाळदे के.एम. जिल्हासचिव गणेश आजबे, रविंद्र वाकोडे, भाई चंद्रकांत चव्हाण, माने जी.व्ही., विक्रम मायाचारी, संजय यळवंते, कदम एन.टी., ढेंगळे व्ही.एस., दिनेश पाटील, बीड जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मार्गदर्शक डी.जी.तांदळे यांची नावे आहेत.